# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(दुपार)**

**दिनांक ११.०८.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १०.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०९ केसेसमध्ये १० ईसमावर कारवाई करून एकुण ६३,२४०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०२ केसेसमध्ये ०२ इसमांवर कारवाई करुन १,८७५/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,२०४ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,३४,१००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक १०.०८.२०२६ चे ११.०० वा. ते दिनांक ११.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये एकुण ०२ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. २ पोलीसांची कामगिरी :— अवैध हुक्का पार्लर चालकांविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १०.०८.२०२६ चे १७.३० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट ०२ पोलीसांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून पोलीस ठाणे सदर हद्दीत माऊंट रोड, सदर, बुटी कम्पाऊंड येथील ''नो व्हेअर कॅफे'' येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे कॅफेचा चालक मालक आरोपी १) गौरव श्रीराम बोकडे, वय ३३ वर्षे, रा. प्लॉट नं. १४, ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर हा कॅफेतील वेटर आरोपी २) परेश मदन सोरते, वय २० वर्षे, रा. निकालस मंदीर, ईतवारी याचे मदतीने शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य हुक्का पदार्थ सेवनाकरीता ग्राहक आरोपी ३) वैभव श्रीकृष्ण देवहाते, वय ३४ वर्षे, रा. २०३, तुळशी विहार, जयताळा ४) मोहम्मद ईत्तेफाक वल्द मोहम्मद शकील, वय २८ वर्षे, रा. किल्ला रोड, महाल यांना पुरवितांना समक्ष मिळुन आले. आरोपी हे विनापरवाना स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता अवैधरित्या हुक्का पार्लर चालवित असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे ताब्यातुन हुक्का पार्लरकरीता उपयोगात येणारे वेगवेगळे फ्लेव्हरचे तंबाखु, साहित्य हुक्का पॉट व ईतर साहित्य असा एकुण ४५,५००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींचे विरूध्द पोलीस ठाणे सदर येथे कलम ४(१), ५(१)(२१) सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने अधिनीयम २००३ महाराष्ट्र सुधारणा अधिनीयम २०१८ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपींना मुद्देमालासह सदर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांच्या मार्गदर्शनाखाली, मपोनि. श्रीमती शुभांगी देशमुख, पोउपनि. मनोज राऊत,

सफौ. गजेंद्रसिंग ठाकुर, पोहवा. विजय यादव, कमलेश गणेर, प्रविण शेळके, नापोअं. सुरेश तेलेवार, पोअं. मंगल जाधव व आशिष धंदरे यांनी केली.



**३) सिताबर्डी पोलीसांची कामगिरी :— जबरी चोरी करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०९.०८.२०२६ चे ०९.३० वा. ते १०.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी श्रीमती मिनाश्री चंद्रमोवली अय्यर, वय ७१ वर्षे, रा. प्लॉट नं. ९३३, खरे टाऊन, धरमपेठ, नागपुर ह्या पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत रजत महोत्सव स्कुल, अन्नपुर्णा किराणा स्टोअर्स जवळुन रस्त्याने पायदळ जात असतांना, त्यांचे मागुन एका दुचाकीवरून आलेल्या ईसमाने त्यांचे हातातील रोख ४००/—रू. व मोबाईल फोन, आधार कार्ड व एटीएम कार्ड असलेली पिशवी जबरीने हिसकावुन पळुन गेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे आरोपीविरूध्द कलम ३०४(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासात सिताबर्डी पोलीसांनी तांत्रीक तपास करून आरोपीस निष्पन्न करून, सापळा रचुन आरोपी सागर नरेंद्र तिवारी, वय २१ वर्षे, रा. प्लॉट नं. ८, प्रभु नगर, जयताळा, नागपुर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद जबरी चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन ०१ मोबाईल फोन व गुन्ह्यात वापरलेली डिओ मोपेड असा एकुण ४०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी वपोनि. सुहास राऊत, दुपोनि. मनिष कोल्हटकर यांचे मार्गदर्शनात पोउपनि. शाम वारंगे, पोहवा. नंदकिशोर वालदे, पोअं. शतृघ्न मुंढे, प्रशांत भोयर, चेतन शेंडे, सचिन भोयर व नैनिश तलवारे यांनी केली.



**४) कपीलनगर पोलीसांची कामगीरी :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपींना अटक. वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस.**

दिनांक १०.०८.२०२६ चे २३.१५ वा. चे सुमारास, कपीलनगर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, म्हाडा क्वॉर्टर चौक ते दिपक नगर चौक दरम्यान रोडवर काळ्या रंगाचे विना नंबर प्लेट चे मोपेडवर दोन ईसम संशयीतरित्या फिरत आहेत. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचे मुले पोलीसांना पाहुन पळण्याचे प्रयत्नात असतांना, त्यांना ताब्यात घेतले. पंचासमक्ष

त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांची नावे १) किर्तीराज उर्फ राज हेजमेजर जयराम, वय १८ वर्षे, २) अॅलेक्स उर्फ कालु सचिन भोयर, वय २५ वर्षे, दोन्हीही रा. बिल्डींग नं. ६१, म्हाडा कॉर्टर, म्हाडा कॉलोनी, कपीलनगर, नागपूर असे सांगीतले. त्यांची अंगझडती घेतली असता आरोपी क्रं. १ चे कमरेत एक लोखंडी चाकु किंमती २५०/— रू. चा मिळुन आला. त्यांचे जवळील गाडीचे डिक्कीची पाहणी केली असता, त्यामध्ये नंबरप्लेट क्र. एम.एच. ४९ ए.डब्ल्यु. २८५६ अशी मिळाल्याने वाहनाविषयी विचारपुस केली असता, आरोपींनी नमुद वाहन पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत मेकोसाबाग, सिंधी कॉलोनी येथुन चोरी केल्याचे सांगीतले. आरोपींचे ताब्यातुन लोखंडी चाकु व अॅक्सेस मोपेड क्र. एम.एच. ४९ ए.डब्ल्यु. २८५६ असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे कपीलनगर येथे कलम ४, २५ भा.ह.का. सहकलम १३५ म.पो.का अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींकडुन वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे. आरोपींना मोपेडसह जरीपटका पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी वपोनि. श्री. सतीष आडे यांचे मार्गदर्शनात पोउपनि. प्रशांत राऊत, पोहवा. शहजाद शेख, पोअं. सागर बघेल, चंद्रशेखर डोंगरे, मुकेश हलमारे व निलेश पवार यांनी केली.




**५) गुन्हेशाखा युनिट क्र. १ पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास शस्त्रासह अटक.**

दिनांक १०.०८.२०२६ चे १४.४५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. १ पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, भिम नगर, वार्ड क्र. ३, ईसासनी रोड, शिव मंदीर जवळ राहणारा हद्दपार ईसम हा घरी आलेला आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे हद्दपार ईसम नामे विकास उर्फ विक्की मोहन राहांगडाले, वय ३७ वर्षे त्याचे राहते घरी मिळुन आला. त्यास विचारणा केली असता, त्याने कोणताही परवानगी नसल्याचे सांगीतले. पंचासमक्ष त्याचे घराची झडती घेतली असता, त्याचे ताब्यातुन एक लोखंडी चाकु किंमती ३००/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपीला पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ३५२६/२०२४, दिनांक २३.१०.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीतील राहते घरी शस्त्रासह समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे एमआयडीसी येथे आरोपीविरूध्द कलम १४२,१३५ म.पो.का., सहकलम ४, २५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह एमआयडीसी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांच्या मार्गदर्शनाखाली, पोनि. प्रशांत ठवरे, पोउपनि. ओमप्रकाश कोठे, सफौ. विनोद देशमुख, पोहवा. रितेश तुमडाम व पोअं. अजमत शेख यांनी केली.

**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे लकडगंज :— फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी निर्भय मोतीराम राऊत, वय २९ वर्षे, रा. प्लॉट क्र. डि/३२, वृंदावन नगर, नंदनवन, नागपूर यांना नौकरीची आवश्यकता होती. त्यांची ओळख पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत प्लॉट नं. १०५, खांडवानी आर्केड, आंबेडकर चौक, सि.ए. रोड येथील श्री. साई कन्सल्टंसी चे संचालक, आरोपी किरण महादेवराव हेडाऊ, वय ५५ वर्षे, रा. अभिनव घरकुल योजना, फ्लॅट नं. एमजी १२, चिखली, कळमना, नागपुर याचे सोबत झाली. आरोपीने फिर्यादीला नौकरी लावुन देण्याचे आमिष देवुन, फिर्यादीचा विश्वास संपादन केला. आरोपीवर फिर्यादीचा विश्वास बसल्याने, दिनांक ०१.०१.२०२४ ते दि. ०१.०१.२०२६ चे दरम्यान, आरोपीने फिर्यादीकडुन वेळोवेळी फोन पे व आरटीजिएस द्वारे एकूण ११,००,०००/—रू. घेतले. आरोपीने फिर्यादीस कोणतीही नौकरी लावुन न देता उडवा—उडवीचे उत्तरे देवुन नेहमी टाळाटाळ केली. फिर्यादी यांनी आरोपीस रक्कम परत मागीतली असता, आरोपीने रक्कम परत न करता, फिर्यादीला 'मी हार्ट पेशंट आहे, मला काही कमी जास्त झाल्यास तुला जेलमध्ये जावे लागेल' असे धमकाविले. आरोपीने अशाचप्रकारे ईतर ०४ व्यक्तींनासुध्दा नोकरी लावुन देण्याचे खोटे आमिष देवुन, त्यांचेकडुन एकुण १४,२३,८६५/—रू. घेवुन, त्यांनासुध्दा कोणतीही नोकरी लावुन दिली नाही. अशाप्रकारे आरोपीने फिर्यादी व ईतर ०४ जणांचा अन्यायाने विश्वासघात करुन, त्यांची एकुण २५,२३,८६५/—रू. ची आर्थिक फसवणूक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे लकडगंज येथे मपोउपनि. सोनल शिंदे ९८९२२६८८६२४ यांनी आरोपीविरूध्द कलम ३१८(३),३१८(४),३१६(२),३५१(२) भा. न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे अजनी :—** दिनांक ३०.०७.२०२६ रोजी पोलीस ठाणे अजनी हद्दीत, मेडीकल हॉस्पीटल कॅज्युअल्टी परीसर येथे एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ५५ वर्षे वयाचे बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल वार्ड नं. ५२ येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान दिनांक १०. ००८.२०२६ चे १२.३० वा. डॉक्टरांनी त्यांना मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकाचे वर्णन— रंग सावळा, उंची ५ फुट २ इंच, चेहरा गोल, बांधा सडपातळ, अंगात निळ्या रंगाचे रेघाटी शर्ट व फुलपॅन्ट घातलेले, दाढी पांढरी वाढलेली, डोक्याला टक्कल पडलेले असे आहे. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे अजनी येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे अजनी येथे मपोउपनि. गिता रासकर यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**